



दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : ३४१, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.२२ जुलै २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# मुलींना शिव्या घालून मारलं, कपडे फाडले, अभिजीत दिपकेंनी शरद पवारांकडे मांडली व्यथा





**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, नवी दिल्ली :** कॉक्रोच जनता पार्टीचे प्रमुख अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वात दिल्लीच्या जंतरमंतर मैदानावर अजूनही आंदोलन सुरु आहे. सीजेपीच्या कालच्या मोर्चात झालेल्या लाठीचार्जनंतर देशभरातून वेगवेगळ्या प्रतिक्रिया दिल्या जात आहे. पोलिसांचे लाठीचार्जचे व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले आहेत. आंदोलनाची दाहकता आणि विद्यार्थ्यांचा रोष पाहून ज्येष्ठ नेते शरद पवार हे स्वत: दिल्लीच्या जंतरमंतर मैदानावर दाखल झाले. शरद पवार यांनी अभिजीत दिपके यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी अभिजीत दिपके यांची विचारपूस केली.

**शरद पवारांनी दिपकेंना मागण्या विचारल्या...**

यावेळी शरद पवारांनी अभिजीत दिपके यांना काय-काय मागण्या आहेत? याबाबत प्रश्न विचारला. त्यावर अभिजीत दिपके यांनी माहिती दिली. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा. दुसरी मागणी म्हणजे नीट पेपरफुटीमुळे ज्या विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली त्यांच्या कुटुंबियांना १ कोटी रुपये मोबदला मदत म्हणून द्यावा. तिसरी गोष्ट म्हणजे सोनम वांगचुक यांची तातडीने सुटका करावी. जेवढ्या विद्यार्थ्यांवर गुन्हा दाखल झाला आहे त्या सर्वांवरील गुन्हे मागे घेण्यात यावेत, अशा मागण्या अभिजीत दिपके यांनी सांगितल्या.

**अभिजीत दिपकेंनी पवारांकडे मांडल्या व्यथा...**

आम्ही कुणालाही आंदोलनाचं आवाहन केलं नव्हतं. लोकं स्वत:हून आंदोलन करत आहेत. सरकार जिकडेतिकडे विद्यार्थ्यांशी अमानुषपणे वागत आहे. दिल्ली पोलिसांची चौकशी झालीच पाहिजे, अशी मागणी अभिजीत दिपके यांनी केली.

मुलींना शिव्या घालून मारलं. मुलींचे कपडे फाडले आहेत. १५ ते १६ वर्षांच्या मुलींचे दिल्ली पोलिसांच्या मेल (पुरुष) पोलिसांनी कपडे फाडले आहेत. एका मुलीच्या छातीवर पाय देवून दिल्ली पोलिसांनी मारहाण केली. १२ वर्षाच्या मुलीचे डोके फोडले आहे, अशी व्यथा अभिजीत दिपके यांनी शरद पवारांना सांगितली.

**आंदोलन किती दिवस चालेल? दिपकेंना पवारांचा प्रश्न**

यावेळी शरद पवारांनी आंदोलकांच्या जेवणाची व्यवस्था कशी केली जाते? असा प्रश्न विचारला. त्यावर अभिजीत दिपके यांनी लोकं स्वत:हून देत आहेत, असं सांगितलं. शरद पवारांनी अभिजीत दिपकेंना किती दिवस हे आंदोलन चालणार? असं विचारलं. त्यावर त्यांनी आता आम्हाला ३१ दिवस झाले आहेत. गेल्या ३१ दिवसांपासून आम्ही इथेच बसलो आहोत. काल जे झालं त्यामुळे लोकांमध्ये राग वाढलेला आहे. सरकार मुलांसोबत असं का वागत आहे? आम्ही मागत काय होतो? त्यांनी जसा लाठीचार्ज केला तसा करेल असं कधी वाटलं नव्हतं, असं अभिजीत दिपके पवारांना म्हणाले.

**शरद पवारांच्या समोर अभिजीत दिपकेंची माध्यमांना प्रतिक्रिया**

पेपरफुटी का होत आहे? कारण ॲक्शन घेतली जात नाही. जोपर्यंत अशा मंत्र्यांना पदावरुन काढलं जात नाही तोपर्यंत तो कारवाई करणार नाही. खासगी कंपन्यांमध्ये कर्मचाऱ्यांकडून चूक झाली तर त्याला काढलं जातं. मग सरकारी मंत्र्यांचा राजीनामा का घेत नाहीत?, अशा सवाल अभिजीत दिपके यांनी यावेळी माध्यमांसमोर केली.

महाराष्ट्राचे विरोधी पक्ष पहिल्या दिवसांपासून आमच्यासोबत आहेत. ज्येष्ठ नेते शरद पवार असतील किंवा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे असतील, ते पहिल्या दिवसांपासून आमच्यासोबत आहेत. सर्व विरोधी पक्ष आहेत. सर्वांचे खासदार येऊन गेले आहेत, असं अभिजीत दिपके म्हणाले.

शरद पवार मुलांबाबतच विचारत होते. त्यांना जेव्हा माहिती पडलं की, मुलांना खूप जास्त मारहाण झाली आहे तेव्हा मला खासदार सुप्रिया सुळेंचा फोन आला की, शरद पवारांना खूप जास्त चिंता वाटत आहे. त्यांना मुलांना भेटायचं आहे. पण इथे खूप जास्त गर्दी आणि पोलीस बॅरिकेट्स हटवू देत नाहीयत. त्यामुळे आम्ही शरद पवारांना आतमध्ये घेऊन जाऊ शकत नाहीत, अशी प्रतिक्रिया अभिजीत दिपके यांनी माध्यमांना दिली.

**शरद पवार काय म्हणाले?**

अभिजीत दिपके यांच्या भेटीवर शरद पवारांनी प्रतिक्रिया दिली. नीट परीक्षेतील पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी दिल्लीमधील जंतरमंतर येथे उपोषण आणि आंदोलन केले आहे. काल आपल्या न्याय्य मागणीसाठी लढा देणाऱ्या विद्यार्थ्यांना पोलिसांनी जी वागणूक दिली, ती लोकशाही मूल्यांना न शोभणारी आहे. आज आंदोलनस्थळी जाऊन विद्यार्थ्यांची भेट घेतली, आंदोलनादरम्यान जखमी झालेल्यांची विचारपूस केली, तसेच त्यांच्या मागण्या सविस्तर जाणून घेतल्या, असं शरद पवार म्हणाले.

देशातील प्रत्येक नागरिकाच्या हक्कांना आणि अधिकारांना भारतीय संविधानाने संरक्षण दिले असून सरकार आणि प्रशासन जनतेला उत्तरदायी आहे. त्यामुळे आपल्या मागणीसाठी शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर व नागरिकांवर दडपशाही करण्यापेक्षा सरकारने त्यांच्या म ागण्याचा संवेदनशीलपणे विचार करावा तसेच त्यांच्या मागण्यांची दखल घेत योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी शरद पवारांनी केली.

# विंचूर परिसरात लोडशेडिंगचा कहर; ग्रामपंचायतीचे वीज महामंडळाला साकडे



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२१, विंचूर (नाशिक) :** निफाड तालुक्यातील मौजे विंचूर आणि ग्रामीण भागात सध्या सुरू असलेल्या तीव्र लोडशेडिंगमुळे नागरिक आणि शेतकरी पुरते हैराण झाले आहेत. या पार्श्वभूम ीवर विंचूर ग्रामपंचायतीच्या वतीने महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या (महावितरण) कनिष्ठ अभियंत्यांना एक लेखी निवेदन देऊन ग्रामीण भागातील लोडशेडिंग तात्काळ कमी करण्याची किंवा पूर्णपणे बंद करण्याची मागणी करण्यात आली आहे.

सध्या शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष सुरू असून, अचानक आणि दीर्घकाळ होणाऱ्या लोडशेडिंगमुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासात मोठे अडथळे निर्माण होत आहेत. रात्रीच्या वेळी वीज नसल्याने मुला-मुलींना अंधारात अभ्यास करावा लागत असून, याचा त्यांच्या गुणवत्तेवर आणि आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याची चिंता पालकांकडून व्यक्त केली जात आहे. केवळ विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसानच नाही, तर वीज खंडित होत असल्याने सर्वसामान्य नागरिकांनाही आपल्या दैनंदिन घरगुती कामांसाठी मोठी कसरत करावी लागत आहे.

दुसरीकडे, सध्या शेतीचा हंगाम सुरू असून शेतकऱ्यांची अनेक कामे विजेवर अवलंबून आहेत. ऐन कामाच्या वेळेतच वीजपुरवठा खंडित केला जात असल्याने पिकांना पाणी देणे आणि इतर शेतीची कामे करणे अशक्य झाले आहे. यामुळे पिकांचे नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

**अखंडित वीजपुरवठा करण्याची मागणी**

विंचूर ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने प्रशासकांनी महावितरणच्या कनिष्ठ अभियंत्यांना विनंती केली आहे की, या गंभीर समस्येवर सहानुभूतीपूर्वक विचार करून ग्रामीण भागातील लोडशेडिंगचे प्रमाण तात्काळ कमी करावे. तसेच शक्य असल्यास हे लोडशेडिंग पूर्णपणे बंद करून परिसराला नियमित आणि अखंडित वीजपुरवठा उपलब्ध करून द्यावा, अन्यथा नागरिकांचा असंतोष अधिक तीव्र होईल, असा सूरही परिसरातून उमटत आहे. अबालवृद्ध आणि शेतकरी वर्गाला दिलासा देण्यासाठी वीज महामंडळ आता काय पावले उचलते, याकडे संपूर्ण विंचूरवासीयांचे लक्ष लागले आहे.

**ग्रामपंचायत प्रशासकांचे प्रतिपादन :**

ग्रामीण भागातील जनता आधीच विविध समस्यांशी झगडत आहे, त्यात आता या अघोषित लोडशेडिंगची भर पडली आहे. नागरिकांचे हाल आणि शेतकऱ्यांचे होणारे नुकसान पाहता महावितरणने या समस्येकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे.

**– प्रशासक, ग्रामपंचायत विंचूर**

# हजारोंच्या उपस्थितीत झरी येथील भव्य इज्तेमाचा शांततेत समारोप



**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.२१, परभणी :** जिल्ह्यातील जिंतूर सेंटरचा तब्लीगी इज्तेमा झरी येथे आयोजित करण्यात आला होता या इज्तेमात आलेल्या दोन दिवसीय भव्य इज्तेमा कार्यक्रमाचा हजारो मुस्लिम बांधवांच्या उपस्थितीत अत्यंत शांततापूर्ण, शिस्तबद्ध आणि आध्यात्मिक वातावरणात समारोप झाला. धार्मिक श्रद्धा, सामाजिक एकात्मता आणि मानवतेचा संदेश देणाऱ्या या इज्तेमातून ईमान, मानवता, बंधुभाव, शांतता, सदाचार, समाजसेवा आणि राष्ट्रप्रेमाचा प्रभावी संदेश देण्यात आला.

कार्यक्रमासाठी पुणे येथील धर्मगुरूंनी प्रमुख मार्गदर्शन केले. आपल्या प्रवचनात त्यांनी सांगितले की, शांती हाच मानवधर्म आहे. प्रत्येक धर्म माणसाला प्रेम, सहकार्य आणि सदाचाराची शिकवण देतो. कोणत्याही धर्माचा उद्देश द्वेष नव्हे, तर मानवतेचे रक्षण आणि समाजात सौहार्द निर्माण करणे हा आहे. समाजात शांतता, संयम, सहनशीलता आणि परस्पर सन्मान या मूल्यांचे जतन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पवित्र कुरआन शरीफमधील आयतींचा संदर्भ देत नैतिक मूल्यांचे महत्त्व विशद करण्यात आले. गरजू, अनाथ, निराधार, विधवा आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना मदत करणे हीच खरी इबादत असल्याचे सांगण्यात आले. समाजातील वंचितांच्या चेहऱ्यावर आनंद फ ुलविणे आणि त्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले धर्मगुरूंनी आपल्या भाषणात आपल्या वागण्या-बोलण्यामुळे कोणालाही त्रास होऊ नये.

दुसऱ्याला मदत करणे हेच सर्वात मोठे पुण्य आहे, असे सांगत प्रत्येकाने स्वतःपासून सकारात्मक बदलाची सुरुवात करण्याचे आवाहन केले. तसेच इज्तेमासाठी जागा, वीज, पाणी, वेअरहाऊस आणि जिनिंगची सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल समाजसेवक तथा कृषिभूषण कांतराव काका देशमुख यांचे विशेष आभार व्यक्त केले.कार्यक्रमाच्या संपूर्ण कालावधीत स्वयंसेवकांनी वाहनतळ, पिण्याचे पाणी, भोजन व्यवस्था, स्वच्छता, आरोग्य सुविधा आणि सुरक्षा व्यवस्थेचे उत्कृष्ट नियोजन केले. त्यामुळे हजारोंच्या उपस्थितीतही कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध, सुरक्षित आणि शांततेत पार पडला.

समारोपाच्या वेळी देशात शांतता, सौहार्द, बंधुभाव आणि समृद्धी कायम राहावी, सर्व धर्मांमध्ये परस्पर प्रेम वृद्धिंगत व्हावे, तसेच शेतकऱ्यांवरील संकटे दूर होऊन त्यांच्या शेतात भरघोस पीक यावे आणि वरुणराजाने राज्यासह मराठवाड्यावर जोरदार कृपावृष्टी करावी, यासाठी विशेष दुआ करण्यात आली.

याशिवाय कामगार, विद्यार्थी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनात सुख-समृद्धी नांदावी तसेच संपूर्ण मानवजातीवर अल्लाहची कृपा राहावी, अशीही प्रार्थना करण्यात आली.यावेळी ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. आपत्कालीन परिस्थितीचा विचार करून अग्निशमन दल आणि रुग्णवाहिका सेवाही घटनास्थळी सज्ज ठेवण्यात आली होती.

**सर्वपक्षीय नेत्यांची उपस्थिती !**

इज्तेमाला समाजसेवक तथा कृषिभूषण कांतराव काका देशमुख, जिल्हा परिषद गटनेते दिलीपराव देशम ुख, जिल्हा परिषद सदस्य माणिकराव हरकळ, दैवत लाटे, दिलीपराव नेते, विशाल देशमुख आणि नरेश देशमुख यांनी भेट देऊन उपस्थितांची विचारपूस केली. विशेष म्हणजे हे सर्व मान्यवर समारोपाच्या दुआपर्यंत उपस्थित राहून कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.

# पाटण शहरात महावितरणचा सावळा गोंधळ, लाईट चालू बंद ! खेळाने इलेक्ट्रिक उपकरणे जळण्याची भीती

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२१, पाटण :** पाटण शहरातील ब्राह्मणपुरी, निनाई आणि लक्ष्मी मंदिर परिसरातील नागरिक गेल्या दोन दिवसांपासून महावितरणच्या अजब कारभाराने पुरते त्रस्त झाले आहेत. काल सकाळपासून आज सकाळपर्यंत तब्बल २० ते २२ वेळा वीजपुरवठा खंडित होत असून, काही मिनिटे लाईट येऊन पुन्हा जात असल्याने नागरिकांच्या संयमाचा बांध तुटला आहे. या सततच्या लपंडावामुळे घरातील आणि दुकानातील महागडी विद्युत उपकरणे जळण्याची भीती निर्माण झाली असून, महावितरणने हा चालू-बंद खेळ तात्काळ थांबवून स्थिर वीजपुरवठा द्यावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

ब्राह्मणपुरी, निनाई-लक्ष्मी मंदिर परिसरात २ दिवसांत २२ वेळा लाईट गायब - चालू-बंद खेळाने टीव्ही, फ्रीज, मोटारी जळण्याची भीती; संतप्त नागरिकांचा सवाल - एकदाच पूर्ण दिवस लाईट बंद करून कामे उरका, पण हा लपंडाव थांबवा.

**– विनायक शेंडे, ब्राह्मणपुरी**

पावसाळ्याचे दिवस असल्याने किरकोळ बिघाड होऊ शकतो, हे नागरिक समजू शकतात. मात्र, दिवसातून २२ वेळा लाईट जाणे म्हणजे हा बिघाड नसून नियोजनशून्य कारभार असल्याचा आरोप नागरिक करत आहे. सतत वीज जाणे-येणे यामुळे व्होल्टेजमध्ये प्रचंड चढ-उतार होत आहे. यामुळे अनेकांच्या घरातील फ्रीज, टीव्ही, वॉशिंग मशीन आणि दुकानातील कॉम्प्युटर, झेरॉक्स मशीन बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. लाईट गेल्यावर पिण्याच्या पाण्याच्या मोटारी बंद पडतात आणि अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचे मोठे हाल होत आहेत. महावितरणचे अधिकारी या गंभीर समस्येकडे लक्ष देऊन ब्राह्मणपुरी, निनाई आणि लक्ष्मी मंदिर परिसरातील वीजपुरवठा तातडीने सुरळीत आणि स्थिर करणार का? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.




## अजितदादा

आज २२ जुलै, महाराष्ट्राच्या राजकारणातील वादळी व्यक्तिमत्व, महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांची जयंती. अजित दादांची जयंती हा शब्द लिहिण्यासाठी लेखणी धजावत नाही कारण २२ जुलैला दादांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्याची सवय या लेखणीला लागली आहे. दादांच्या जयंती निमित्त लेख लिहावा लागेल असे कधी वाटले नव्हते कारण २२ जुलै रोजी दादांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्याची सवय या लेखणीला लागली आहे. असो काही गोष्टी आपल्या हातात नसतात. नियतीपुढे कोणाचे काही चालत नाही. अजितदादा म्हणजे महाराष्ट्राच्या राजकारणातील वादळी व्यक्तिमत्व. महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक नेते होऊन गेले. त्यातील काही नेते त्यांच्या नेतृत्वासाठी, काही नेते त्यांच्या कर्तृत्वासाठी, काही नेते त्यांच्या वक्तृत्वासाठी, काही नेते जनसंपर्कासाठी तर काही नेते प्रशासनावर असलेल्या पकडीसाठी ओळखले जातात. पण अजितदादा हे महाराष्ट्रातील असे एकमेव नेते होते की जे यासर्वांसाठी ओळखले जात होते. अजितदादा म्हणजे महाराष्ट्राच्या राजकारणातील एक वादळ होते. चार दशकांहून अधिक काळ आपल्या कर्तृत्वाने महाराष्ट्राच्या राजकारणावर ठसा उमटवणारा हा वाघ नागरिकांना कायमचा सोडून जरी गेला असला तरी आपल्या कार्याने त्यांनी नागरिकांच्या मनावर जो ठसा उमटवला तो कधीही पुसला जाणार नाही. दादा म्हणजे कामाचा माणूस. दादाकडे गेले की काम होणारच असा विश्वास लोकांना असायचा. काम होण्यायोग्य असेल तर लगेच करणारा आणि होण्यायोग्य नसेल तर तोंडावर नाही म्हणणारा. पोटात एक आणि ओठात एक असे राजकारणी दादा नव्हते जे पोटात आहे तेच बोलणारा आणि तेच करणारा. कडक शिस्तीचा पण तितकाच दिलदार मनाचा. मिश्किल, सुस्वभावी मनात येईल ते पटकन बोलून टाकणारा. बोलताना कशाचीही तमा न बाळगणारा पण आपण बोलल्याने कोणाचे मन दुखावले गेले हे लक्षात येताच जाहीर दिलगिरी व्यक्त करणारा आणि त्यासाठी जाहीर प्रायश्चित घेणारा, स्वतः वेळेचे बंधन पाळणारा आणि इतरांना वेळेचे महत्व पटवून देणारा. तरुणांना निर्व्यवसनी राहण्याचा सल्ला देणारा, चुकीला चूक आणि बरोबर असेल तर बरोबर म्हणणारा, कार्यकर्ता असो की नेता, स्वपक्षातील असो की विरोधातील चुकीचे वागत असेल तर त्याला वडिलकीच्या नात्याने खडसावणारा आणि त्याच नात्याने त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणारा, सतत सत्तेत राहूनही विरोधी पक्षांशी मैत्रीचे संबंध जपणारा, सकाळी सहा वाजता कामाला सुरुवात करणारा आणि ते काम दर्जेदार व्हावे असा हट्ट धरणारा, केवळ आणि केवळ महाराष्ट्राचा विकास हेच डोक्यात असणारा आणि त्यासाठी दिवसाचा रात्र करणारा, भाजप, शिवसेनेसारख्या हिंदुत्ववादी पक्षाशी हातमिळवणी करून सत्ता स्थापन करणारा तरीही शिव, ,शाहू, फुले आंबेडकरांचा पुरोगामी विचार न सोडणारा, त्या विचारांशीच एकनिष्ठ राहणारा, कुटुंब आणि राजकारण यांची योग्य सांगड घालणारा, कुटुंबात राजकारण आणि राजकारणात कुटुंब येऊ न देणारा दादा म्हणजे राजकारणातील वेगळेच रसायन होते. प्रत्येक गाव खेड्यातील कार्यकर्त्याला दादा म्हणजे आपला नेता वाटत होता. जवळपास चार दशकांहून अधिक काळ महाराष्ट्राच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी राहिलेल्या अजित पवार यांचा जन्म २२ जुलै १९५९ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील देवळाली प्रवरा येथे त्यांच्या आजोळी झाला. अजित पवार यांचे शालेय शिक्षण देवळाली प्रवरा येथेच झाले. त्यानंतर ते मुंबईत त्यांचे काका शरद पवार यांच्याकडे दहावी नंतरच्या शिक्षणासाठी आले. महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून दादांनी बारामती गाठली आणि बारामतीतील सहकारी संस्थांच्या माध्यमातून सामाजिक कार्याला सुरुवात केली. दादांच्या राजकीय जीवनाची सुरुवात १९८१- ८२ साली छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे संचालक म्हणून झाली. भारतीय राजकारणातले द्रष्टे नेते काका शरद पवार यांनी त्यांच्यातील नेतृत्व गुण हेरून त्यांना राजकारणात आणले. १९९१ साली आपल्या नेतृत्व गुणाची चुणूक दाखवून दादांनी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत सत्तांतर घडवून आणले. त्याच वर्षी सोमेश्वर सहकारी साखर कारखान्यावर देखील आपले वर्चस्व मिळवले. दादांच्या नेतृत्व गुणाची पारख झाल्याने १९९१ साली शरद पवारांनी दादांना थेट खासदारकीची संधी दिली. खासदार म्हणून मोठ्या मताधिक्याने जिंकून आलेल्या दादांनी काकांसाठीच खासदारकीचा राजीनामा देऊन बारामतीत आमदारकी लढवली तेव्हापासून कामाच्या आणि लोकसंपर्काच्या जोरावर दादा बारामती तालुक्यातून सलग आठ वेळा विक्रमी मतांनी आमदार म्हणून निवडून आले. १९९१ साली पहिल्यांदाच आमदार झालेल्या दादांना सुधाकरराव नाईक यांनी आपल्या मंत्रिमंडळात घेतले आणि कृषी, फलोत्पादन आणि ऊर्जा खात्याचे राज्यमंत्रीपद दिले. १९९९ नंतर त्यांनी ग्रामविकास, पाणीपुरवठा, स्वच्छता ही मंत्रिपदे सांभाळी. जलसंपदा हे खातेही २०१० पर्यंत त्यांच्याकडेच होते. अर्थमंत्री म्हणून तर त्यांनी विक्रम केला. महाराष्ट्राचे अर्थमंत्रिपद त्यांनी सर्वाधिक काळ भूषवले. दादांनी सहा वेळा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेण्याचा विक्रम केला. सहा वेळा उपमुख्यमंत्रीपद भूषवणारे दादा हे देशातील एकमेव राजकीय नेते असतील. दरम्यानच्या काळात त्यांच्या गळ्यात विरोधी पक्षनेत्याची माळही पडली. १९९९ साली शरद पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केल्यावर राष्ट्रवादी पक्ष आणि घड्याळ चिन्ह घरोघरी पोहचवण्यासाठी त्यांनी जीवाचे रान केले. शरद पवार दिल्लीचे राजकारण करत असल्याने महाराष्ट्रातील राष्ट्रवादीची धुरा त्यांच्याच खांद्यावर होती. त्यांच्यामुळेच राष्ट्रवादी काँग्रेसला कायम सत्तेत राहता आले. दादांची जशी राजकारणार पकड होती तशीच पकड त्यांची कला, क्रीडा, साहित्य, सहकार, शिक्षण, जलसिंचन या क्षेत्रावर देखील होती. प्रत्येक क्षेत्राचा बारकाईने अभ्यास करून त्यात सर्वोत्तम देणारा अजित पवारांसारखा दुसरा नेता नाही. त्यांचा इतका कामाचा झपाटा असणारा नेता पुन्हा होणार नाही. अजित पवार यांच्या निधनाने महाराष्ट्राची कधीही न भरून निघणारी हानी झाली आहे. त्यांचा सारखा नेता पुन्हा होणार नाही. त्यांच्या निधनाने राजकारणातील ' दादा' पर्व संपले असे म्हंटले तर वावगे ठरणार नाही. धडाडीचे लोकनेते असणारे सर्वांचे लाडके अजितदादा पवार यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

– श्याम ठाणेदार

# जेन झी च्या संयमाचा 'ऊद्रेक'

वारंवार होणारी पेपरफुटी, परिक्षांचा घोळ, यामुळे विद्यार्थी आणि परिक्षार्थिंच्या भविष्याशी होत असलेला खेळ आणि त्यांच्या जखमेवर मीठ चोळतांना त्यांची झुरळ, परजिवी म्हणून हेटाळणी करणे याची परिणती म्हणजे 'केजी' ची स्थापना झाली त्याला देशातील जेन झी चा ऊस्फुर्त प्रतिसाद मिळाला, परिक्षांचा वारंवार खेळखंडोबा होऊन देखील याबाबत काहीच होत नाही कि जबाबदारी स्वीकारून नैतिकतेच्या आधारावर कोणी राजीनामा देत नाही यामुळे अखेर गेल्या महिन्यापासून केजीपी ने जंतर मंतर वर आंदोलन सुरू केले, कालांतराने सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांचे बळ मिळाले तरी देखील सरकार कडुन काहीच प्रतिसाद दिला गेला नाही कि दखलही घेतली नाही त्यामुळे सोनम वांगचुक यांनी ऊपोषण सुरू केले.



मात्र याबाबत सकारात्मक प्रतिसाद न देता ऊच्च न्यायालयाच्या आदेशाचा हवाला देत दिल्ली पोलिसांनी गेल्या शनिवारी भल्या पहाटे त्यांना जंतर मंतर वरून ऊचलुन नेले आणि हॉस्पिटल मधे ऊपचारासाठी दाखल केले, त्यांना ऊपचारासाठी दाखल करणे आवश्यकच होते मात्र ज्या पद्धतीने हे प्रकरण हाताळले जात आहे त्यामुळे सरकार, दिल्ली पोलिसांच्या कार्यपद्धतीवर मोठेच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.एनटीएची पुनर्परीक्षा झाली निकालही लागला त्यामुळे आता आंदोलन कश्यासाठी असा प्रश्न विचारला जात आहे.

मात्र लागलेल्या निकालातील गोंधळ चव्हाटय़ावर येत आहे. जे याचीच परिणती म्हणून सोमवारी दिल्लित आणि देशात अनेक ठिकाणी जेन झी तसेच जनतेच्या संयमाचा ऊद्रेक झाला, दिल्लित पोलीसांनी लाठीमार केला, यात आंदोलक तसेच पोलीस देखील जखमी झाले. संसदेचे पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी गोंधळ झाला, आंदोलक थेट संसद भवनाकडे आगेकुच करु लागले यामुळे परिस्थिती अधिकच चिघळली. वास्तविक हे प्रकरण सरकारला वेगळ्या पद्धतीने हाताळता आले असते मात्र कुठल्याही आंदोलनाची दखल घ्यायची नाही कि सकारात्मक प्रतिसाद द्यायचा नाही ही या सरकारची कार्यपद्धती वारंवार अधोरेखित होत आली आहे. तेच या वेळी झाले.

या आंदोलकांची एक मागणी आहे ती म्हणजे मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा. वास्तविक जर एखाद्या मंत्री वारंवार अपयशी ठरत असेल तर त्याला जबाबदारीतून मुक्त का केले जात नाही. इतर कोणाकडे जबाबदारी का दिली जात आहे. एका 'प्रधान ला वाचविण्यासाठी देशाला का वेठीस धरले जात आहे? मात्र हे काही यूपीए चे सरकार नाही, एनडीए' च्या काळात कोणीही राजीनामा देत नाही हे राजनाथ सिंह यांनी अगोदरच स्पष्ट केले त्यामुळेच प्रधान यांचा राजीनामा होत नाही. ऐकिकडे तरुणाई हे देशाची शक्ती आहे, ऊद्याचे भविष्य आहे असे दावे-प्रतिदावे करायचे आणि दुसरीकडे या तरुणाईच्या भविष्याशी खेळायचे हे कितपत योग्य आहे. ?

जे. पी. नड्डा यांनी आंदोलकांबरोबर चर्चा केली मात्र आपली फसवणूक झाल्याची आणि टाईमपास झाल्याचे आंदोलन कर्त्यांचे म्हणणे आहे. या गंभीर प्रश्नी देखील सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात आरोप प्रत्यारोप होत आहे. वास्तविक हा प्रश्न देशाचा आहे आणि सत्ताधारी विरोधक यांनी याबाबत एकत्रित प्रयत्न करायला हवेत आणि जेन झी च्या प्रश्नांकडे गांभीर्याने पहायला हवे. तरुणाई क्रांती करु शकतो हे आजवर अनेकदा अधोरेखित झाले आहे, आजचा तरुण, जेन झी हा विचार करणारा, अन्यायाविरुद्ध लढणारा, आजच्या युगातील आहे. मग अशा तरुणाईला अशी वागणूक का दिली जात आहे?. सत्ताधाऱ्यांनी अहंकारपणा - दडपशाही करण्यापेक्षा राजधर्म निभावला पाहिजे. ऐरवी प्रत्येक विषयावर बोलणारे विश्वगुर अशा विषयांवर मात्र मौनव्रत धारण करून बसतात हे अनाकलनीय आहे.

**- अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

# एक तरी वारी आचरावी..!!

चंद्रभागेच्या तिरावर पंढरपूर येथील विठ्ठल-रखुमाईच्या दर्शनासाठी अफाट जनसागर (वारकरी, गरीब-श्रीमंत, आंधळे-पांगळे, सर्व जाती-धर्माचे) आषाढी एकादशी दिवशी टाळ-मृदुंगाच्या गजरात 'विठूचा गजर हरीनामाचा झेंडा रोविला... असे म्हणत' पंढरपूरमय होतो. महाराष्ट्रात मध्ययुगामध्ये अनेक भक्तिसंप्रदाय उदयास आले आणि कमी-अधिक काळ आपला प्रभाव गाजवून क्षीण झाले किवा नामशेष झाले, मात्र महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय याला अपवाद ठरला आहे. या संप्रदायाचा प्रभाव सतत वाढतच राहिलेला




आहे. अगदी १९व्या, २० व्या आणि २१ व्या विज्ञाननिष्ठ शतकामध्येही हा संप्रदाय टिकून आहे. एवढेच नव्हे तर तो समाजशास्त्र आणि साहित्य संशोधक यांच्या कुतूहलाचा विषय होऊन राहिला आहे.

पंढरपूरची वारी हा प्रकार महाराष्ट्रातील वारकरी भक्तिसंप्रदायाला इतर भक्तिसंप्रदायांपासून खास रितीने वेगळा ठरविणारा आहे. काही तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्धीला आलेल्या किंवा पुराणकाळापासून माहात्म्य लाभलेल्या काशी, जगन्नाथपुरी, बद्रिकेश्वर, बालाजी तिरुपती, रामतीर्थ इत्यादी तीर्थक्षेत्रासारखे पढरपूर हे क्षेत्र नाही. पंढरपूरची वारी हा तीर्थक्षेत्रापेक्षा वेगळा प्रकार आहे. पंढरपूरची वारी करणे म्हणजे, तीर्थयात्रेचे पुण्य गाठीस बांधणे अशी काही भावना कोणताही वारकरी बाळगून नसतो. दुसरी आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे,इतर तीर्थक्षेत्रांना यात्रा महणून जाऊन येण्याचा दबाज (पद्धत) असचा व्याक भनेचा दैनंदिन जीवनाशी अतूट संबंध असतोच असे नाही. उलटपक्षी तो तगा नसतो असे म्हणता येईल; परंतु पढरपूरची वारी करणाऱ्या माणसांचे जीवन अगदी बदलून जावे अशी अपेक्षा असते. मुख्य म्हणजे आपण वारकरी असून वारकऱ्याचे व्रतस्थ जीवन जगत आहोत याची निदर्शने करणाऱ्या तुळशीमाळा, त्रिपुंडा किंवा खांद्यावर 'भगवी पताका व तो टाळ-मृदुंगाचा आवाज यासारख्या खाणाखुणा त्याने निश्चयाने बाळगाव्यात अशीही अपेक्षा असते एवढेच नव्हे तर त्याने भगवद्भक्ती करावी, कोणत्या यंत्राचे आणि ग्रंथाचे पंठण करावे यासंबंधानेही काही आदेश असतात. खरा वारकरी या आदेशांचे जास्तीत जास्त पालन करण्यात धन्यता मानतो. अन्य पंथांमध्ये दाखल होणाऱ्या भक्तांवर अशाच प्रकारच्या आदेशांचे निबंध असले, तरी त्या निबंधांना कर्मकांडाचे स्वरूप आलेले असते. वारकरी पंथामध्ये कर्मकांडाचा मुळागत निर्बंध केलेला आहे.

महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचे अन्य भक्तिसंप्रदायांपेक्षा असलेले वेगळेपण अनेक प्रकारे सांगता येईल. येथे फक्त एका महत्त्वाच्या गोष्टीचा निर्देश करायचा आहे, तो म्हणजे वारकऱ्यांचे कुलदैवत कुठलेही असो, वारकरी होताच पंढरपूरच्या विठ्ठलाचा भक्त होऊन जाता, यातही पुन्हा वैशिष्ट्य असे पंढरपूरच्या विठ्ठलाची भक्ती स्वीकारल्यावर अन्य देवतांच्या भक्तीचा त्याने त्याग करावयास पाहिजे असे बंधन त्याच्यावर नसते. त्यातूनच मग तो ईश्वराकडे (परमेश्वर) एकत्वबुद्धीने पाहण्यास शिकतो, म्हणूनच महासमन्वय ही संस्कृती घेऊन उभा राहिलेला वारकरी पंथ महाराष्ट्रात नुकताच लोकप्रिय झाला असे नव्हे, तर शतकानुशतके खंबीरपणे पाय रोवून स्थिरावला आहे. ज्ञानदेव, नामदेवाच्या काळी महाराष्ट्रावर असलेल्या अस्मानी-सुलतानी आपत्तीमध्ये जनतेचा धीर

आधुनिक खचू न देता त्यांची मने समर्थ बनविण्याचे काम या थोर संतांच्या भागवत धर्माने केले, ज्ञान, ऐश्वर्य, शक्ती, बळ, वीर्य, तेज या सहा गुणांनी संपन्न असणाऱ्या भगवंताचा धर्म शक्तिगर्भआहे. यातून स्वराज्य प्राप्त होते, रक्तहिन सामाजिक क्रांतीची विचारधारा निर्माण करण्याची ताकद या विचारसूत्रीत असली, तरी या गोष्टीस दुबळेपणा-भेकडपणाचे स्वरूप नसावे, म्हणून संत तुकाराम म्हणतात, 'तरी भले देऊ कासेची लंगोटी। नाठाळाच्या माथी हाणु काठी। वारकरी संघाच्या विचारांत जातिभेद, विषमता, अज्ञान, अंधश्रद्धा यांचा विचार होताना विठ्ठल उपासना आणि पंढरपूर वारीचे पडसाद उमटतात. ईश्वरप्राप्तीसाठी संसार न सोडता संसारात राहूनदेखील पारमार्थिक आनंद मिळवता येतो हे वारीतून दिसून येते. जीवनाचे ध्येय भक्ती हेच मानले आहे. मनामनातील मशागत, करणारा वारकरी संप्रदाय जीवन अंतर्बाह्य बदलून टाकतो, शुद्धाचरण सात्विक आहाराबरोबर चांगल्या विचारातून परस्पर द्वेष, मद, क्रोध, त्वेष यांसारख्या गोष्टींपासून दूर राहण्याची शिकवण जणू वारी-वारकरी आचारात मिळते, यालाच आध्यात्मिक अभ्यास म्हटला जातो. वारीला सुरुवात केली की, वर्षानुवर्षे पायी वारी करून वारकरी विठ्ठलमय होतात, वारीची परंपरा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जाते. कोल्हापूरच्या गडहिंग्लज तालुक्यातील जखेवाडी गावच्या ह.भ.प के. जनाबाई शिवाप्पा संकपाळ यांनी आयुष्यात ३६ पायी वाऱ्या केल्या. १०५ व्या वर्षी माऊलीचे निधन झाले. त्यांची शेवटची इच्छा अशी होती की माझी अस्ति पंढरपूरच्या चंद्रभागेत करावी त्यांचे नातू.. देवदास संकपाळ यांनी अस्तितचंद्र पंढरपूरला घेऊन जाऊन विसर्जन करून आपल्या आजीची शेवटची मनोकामना पुरी केली. त्यानंतर त्याच्या मोठ्या सूनबाई इंदुबाई मारुती संकपाळ तसेच त्यांचे पुत्र्ड...शिवाजी चौगुले व त्यांच्या पत्नी प्रियांका यांनी तुळशीमाळ घालून वारीची परंपरा अखंडपणे सुरू ठेवली आहे.

!!पंढरीची वारी आहे माझे घरी। आणिक न करी तीर्थव्रत !!

!! व्रत एकादशी करीन उपवासी। गाईन अहर्निशी मुखी नाम !! नाम विठोबाचे घेईन मी वाचे। बीज कण्यांतीचे तुका म्हणे...!!

वारकऱ्यांचा पोपाख पांढरा शुभ्र कुडता, धोतर व डोक्यावर टोपी, गळ्यामध्ये तुळशीच्या माळा, हातामध्ये भगवा पताका व कपाळावर गंध, भजन-कीर्तनामध्ये ते. धुंद असतात. धुंद असतेवेळी बघताना असे वाटते की, आपणही त्यांच्यामध्ये मग्न व्हावे, म्हणून आयुष्याला येऊन एक तरी वारी आचरावी... पंढरपूरची...!! !!

**!! जय जय राम कृष्ण हरी !!**

**ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मु.पो.मासा बेलेवाडी.**
**कागल-कोल्हापूर.९८६७७३२५०४**

## अनाथा

वारीत घुसलाचोरटा
काहीतरी लागे हाता
हात जोडतो विठ्ठला
ऐवज लाभूद्या आता

सहज सत्संग घडला
वारी चालता चालता
रंगूनगेलेला तो पुरता
हरि हरि मुखे बोलता

टाळमृदुंगाच्या गजरी
मुग्धहो झुलता हलता
कपाळी अबीरगुलाल
बदलून गेलाय भलता

गावे उसळती स्वागता
जथा भेटे उस्फुर्तदाता
ओसंडून वाहते झोळी
पुरे पुरे अरे किती देता

भजन किर्तनात रंगला
सुखवेहरिकथा ऐकता
वारकरीचेहरे सारखेचं
प्रत्येक कृत्यात एकता

दमूनसुखाने झोपे तो
छान अनुभवेस्वस्थता
रात्रीस चौर्यकर्मा मग्न
आधीअसे अस्वस्थता

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध अचूक बातमी

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२१, अकोले (अहिल्यानगर) :** नगर जिल्ह्याची जिवनदायिनी असलेल्या भंडारदरा पाणलोटात गत तीन दिवसांपासून मान्सून सक्रिय झाला असून धिम्या गतीने का होईना नवीन पाण्याची धरणात आवक होत असल्याने अखेर काल सोमवारी रात्री उशीरा या धरणातील पाणीसाठा ६५ टक्क्यांवर पोहचला. ११०३९ दलघफू क्षमतेच्या या धरणात दिनांक २० जुलै रोजी सायंकाळी ७१६१ दलघफू (६४.८७ टक्के) पाणीसाठा झाला होता. रात्री उशीरा यात वाढ होऊन साठा ६५ टक्के झाला. काल सकाळी संपलेल्या २४ तासांत धरणात नव्याने ८६ दलघफू पाणी नव्याने दाखल झाले. निळवंडे धरणातही धिम्या गतीने पाणी येत आहे. ८३३० दलघफू क्षमतेच्या या धरणात पाणीसाठा २९६८ दलघफू (३५.६१टक्के) झाला आहे.

## पेठशिवणी मंडळाच्या सोयाबीन पीक विम्याला हिरवा कंदील; विभागीय आयुक्तांचा शेतकऱ्यांच्या बाजूने निकाल



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.२१, पालम (परभणी) :** पालम तालुक्यातील पेठशिवणी मंडळातील शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा देणारा निर्णय विभागीय आयुक्त कार्यालयाने दिला असून, प्रलंबित असलेल्या खरीप २०२५ – २६ च्या सोयाबीन पीक विम्याचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर शेतकऱ्यांच्या बाजूने निकाल देत विमा कंपनीला पात्र शेतकऱ्यांना विमा रक्कम अदा करण्याचे आदेश दिले गतवर्षी अतिवृष्टीमुळे पालम तालुक्यातील शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते तालुक्यातील पाच महसूल मंडळांपैकी चार मंडळांतील शेतकऱ्यांना सुमारे २२ कोटी रुपयांचा पीक विमा मंजूर झाला होता. मात्र, पेठशिवणी मंडळाचा सोयाबीन पीक विमा प्रलंबित ठेवण्यात आला होता. याविरोधात शेतकऱ्यांनी पीक विमा चळवळीच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा केला.

या प्रकरणी १३ मे २०२६ रोजी मंत्रालयात बैठक, त्यानंतर २२ मे २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात सुनावणी झाली होती. जिल्हाधिकारी यांनी खरीप हंगाम २०२५ – २६ मधील अतिवृष्टीची परिस्थिती लक्षात घेऊन, उपग्रहाद्वारे (Satellite) प्राप्त तांत्रिक उत्पादनापेक्षा पीक कापणी प्रयोगातून मिळालेल्या प्रत्यक्ष उत्पादनालाच विमा परिगणनेसाठी ग्राह्य धरावे, असा निर्णय दिला होता. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना योग्य विमा रक्कम मिळण्याचा मार्ग मोकळा झाला होता. मात्र, या निर्णयाविरोधात विमा कंपनीने विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे आक्षेप दाखल केला. त्यावर दि.२१ जुलै रोजी झालेल्या अंतिम सुनावणीत विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेत शेतकऱ्यांच्या बाजूने निर्णय दिला आणि विमा कंपनीला पात्र शेतकऱ्यांना विमा रक्कम वितरित करण्याचे आदेश दिले. या निर्णयामुळे पेठशिवणी मंडळातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, विमा रक्कम वाटपाचा मार्ग आता पूर्णपणे मोकळा झाला आहे. सुनावणीसाठी पीक विमा चळवळीतील शेतकरी बंटी लांडगे, बालाजी आज्या बरडे , बालाजी अण्णा बरडे (अण्णा), हेमचंद्र शिंदे, रूपेश शिनगारे, भास्करराव कराळे, ओमकार ठाकूर, सरपंच शिवाजी वाडीवाले, रमेश शिनगारे, मोतीराम शिंदे आदी उपस्थित होते. तसेच कृषी विभाग, परभणी येथील दौलत चव्हाण, थिट्टे मॅडम तसेच विमा कंपनीचे प्रतिनिधीही उपस्थित होते.

## म्हाते-केळघर पंचक्रोशीतील ५०० विद्यार्थ्यांना जिजाऊ संस्थेतर्फे मोफत वह्यांचे वाटप

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.२१, मेढा (सातारा) :** जावली, जिजाऊ सामाजिक संस्था आणि दि ग्रेट जावली महाबळेश्वर प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने म्हाते व केळघर पंचक्रोशीतील शालेय विद्यार्थ्यांसाठी मोफत वह्या वाटपाचा उपक्रम उत्साहात पार पडला.

या उपक्रमांतर्गत जवळपास ५०० विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वितरण करण्यात आले. तसेच दि ग्रेट जावली महाबळेश्वर प्रतिष्ठान यांच्यावतीने केळघर हायस्कूल मधील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचा प्रोत्साहनपर बक्षिसे देऊन गौरव करण्यात आला.

या उपक्रमाअंतर्गत म्हाते पंचक्रोशीतील म्हाते हायस्कूल, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा म्हाते खुर्द, म्हाते बुद्रुक, वाघदरे, गोंदेमाळ, दुंद तसेच केळघर पंचक्रोशीतील केळघर हायस्कूल व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा केळघर येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.या दोन्ही संस्थांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेला हा दुसऱ्या पर्वातील शैक्षणिक उपक्रम असून, ज्ञानदानाची सामाजिक परंपरा सातत्याने जपण्याचा संकल्प यानिमित्ताने पुन्हा अधोरेखित झाला.

जिजाऊ सामाजिक संस्थेचे संस्थापक निलेश सांबरे यांच्या नेतृत्वाखाली संस्था संपूर्ण महाराष्ट्रभर विविध सामाजिक, शैक्षणिक व लोककल्याणकारी उपक्रम राबवत असून, त्याचा लाभ लाखो विद्यार्थी व नागरिकांना होत आहे.

यावेळी जिल्हा परिषद सदस्या कविता ओंबळे, शिवसेना सातारा जिल्हा सहसंपर्कप्रमुख एकनाथ ओंबळे, जिजाऊ संस्थेचे परेश कारंडे, दि ग्रेट जावली महाबळेश्वर प्रतिष्ठानचे अध्यक्ष शंकर दळवी, सचिव विकास दळवी यांच्यासह विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि शिक्षणाला मिळालेली प्रेरणा हेच या उपक्रमाचे खरे यश ठरले.

## वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी पोलिसांचा सज्ज पहारा; विठुरायाच्या भेटीसाठी निर्धास्त वारी

### ३४२ अधिकारी, ३ हजार ५२८ पोलीस अंमलदार आणि ३ हजार ११० होमगार्ड तैनात

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२१, तुंगत (पंढरपूर) :** आषाढी शुद्ध एकादशीच्या पार्श्वभूमीवर श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरात दाखल होणाऱ्या लाखो वारकरी भाविकांच्या सुरक्षेसाठी पोलीस प्रशासनाने अभूतपूर्व नियोजन केले असून संपूर्ण यंत्रणा युद्धपातळीवर सज्ज झाली आहे. सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांनी ही माहिती देताना, वारकरी भाविकांची सुरक्षितता आणि वारी निर्विघ्नपणे पार पडणे हेच आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे, असे स्पष्ट केले.आषाढी वारीदरम्यान सुरक्षा, वाहतूक नियोजन आणि कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी ३४२ पोलीस अधिकारी, ३ हजार ५२८ पोलीस अंमलदार आणि ३ हजार ११० होमगार्ड यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

यामध्ये एक पोलीस अधीक्षक, चार अपर पोलीस अधीक्षक, २२ पोलीस उपअधीक्षक, ५३ पोलीस निरीक्षक, २६३ सहाय्यक पोलीस निरीक्षक व उपनिरीक्षक यांचा समावेश आहे. याशिवाय ७ एसआरपीएफ कंपन्या, १० बॉम्ब शोधक व नाशक (ड्रड) पथके, एक ठउझ पथक, तीन टढ (क्विक रिस्पॉन्स टीम) आणि आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी प्रशिक्षित १६ उअठढ पथके तैनात करण्यात आली आहेत. चंद्रभागा नदी परिसरातील




जलवाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी १० ठिकाणी होडी नियंत्रण पथके कार्यरत करण्यात आली आहेत.

**४६ वॉच टॉवर आणि ३५२ सीसीटीव्हींचे 'गरुडनजर'**

वारीतील प्रचंड गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी नदीपात्र, ६५ एकर परिसर, महाद्वार, महाद्वार घाट, पत्राशेड यासह महत्त्वाच्या ठिकाणी ४६ वॉच टॉवर उभारण्यात आले आहेत. तसेच ३५२ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे संपूर्ण यात्रा परिसरावर चोवीस तास लक्ष ठेवले जाणार आहे.

वारकरी भाविकांच्या सुरक्षेसाठी आणि चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी विशेष 'माऊली स्कॉड' कार्यरत करण्यात आले आहे. या स्कॉडमधील पोलीस अधिकारी आणि कर्मचारी वारकरी व सामान्य नागरिकांच्या वेशात गर्दीत वावरून संशयास्पद हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवणार आहेत.भाविकांना तातडीने मदत मिळावी यासाठी सावरकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चंद्रभागा वाळवंट, अंबाबाई पटांगण यासह १३ ठिकाणी तीर्थक्षेत्र पोलीस मदत केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. तसेच ध्वनीक्षेपक यंत्रणेद्वारे वारकऱ्यांना सतत सूचना देण्यात येणार आहेत. वारीदरम्यान वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या आदेशानुसार जड वाहतूक शहराबाहेरून वळविण्यात आली आहे. वाहतूक नियंत्रणासाठी १३ डायव्हर्शन पॉइंट सुरू करण्यात आले असून, खाजगी वाहनांसाठी शहरात व शहराबाहेर १७ वाहनतळांची व्यवस्था करण्यात आली आहे. सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांनी वारकरी भाविकांना पोलीस प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करून सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. वारकरी, नागरिक आणि प्रशासन यांच्या सहकार्यामुळेच आषाढी वारी सुरक्षित, शांततापूर्ण आणि यशस्वी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## कायमस्वरूपी शिक्षकांच्या मागणीसाठी मांडवे खुर्द ग्रामस्थांचे आजपासून आमरण उपोषण

### मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा बहुमान प्राप्त शाळेला शिक्षकच नाहीत

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२१, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील मांडवे खुर्द जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये अनेक महिन्यांपासून आवश्यक तितके शिक्षक व कायमस्वरूपी मुख्याध्यापक नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून वेळोवेळी मागणी करूनही शिक्षण विभागाकडून कायमस्वरूपी शिक्षकांची नेमणूक करणे दूरच, उलटपक्षी रिक्त जागांवर नवीन नेमणूक करण्यावर बंदी घालण्यात आल्याने संतप्त मांडवे खुर्द ग्रामस्थांनी आक्रमक पवित्रा घेतला असून आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. पारनेर अहिल्यानगर मांडवे खुर्द हे अंदाजे २ हजार लोकवस्तीचे गाव असून तेथील जिल्हा प्राथमिक शाळेमध्ये इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंत २०० हून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. एवढी विद्यार्थीसंख्या असूनही शाळेत एक पदवीधर शिक्षक आणि एक कायम स्वरूपी मुख्याध्यापक यांची पदे रिक्त आहेत.




गेल्या काही वर्षांत ग्रामस्थ, पालक, माजी विद्यार्थी, लोकप्रतिनिधी आणि दानशूर व्यक्तींनी एकत्र येऊन शाळेला उत्कृष्ट भौतिक सुविधा उपलब्ध करून दिल्या. आज शाळेला मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा हा बहुमानही मिळाला. शाळेचा लौकिक वाढवण्यासाठी आपण ग्रामस्थांनी कोणतीही कसर ठेवली नाही.

मात्र, दर्जेदार शिक्षणासाठी आवश्यक असलेले शिक्षकच नसतील तर या सर्व विकासाला काय अर्थ उरतो? गावातील शालेय व्यवस्थापन समिती व नागरिकांनी मार्च महिन्यापासून गटशिक्षणाधिकारी पवार मॅडम यांच्याशी प्रत्यक्ष भेटून तसेच दूरध्वनीद्वारे सातत्याने संपर्क साधत असून त्यांच्या कडे मागणी केवळ एवढीच आहे की, शाळेला तात्काळ एक पदवीधर शिक्षक आणि एक मुख्याध्यापक कायमस्वरूपी उपलब्ध करून द्यावेत. ही कोणाची वैयक्तिक, राजकीय किंवा स्वार्थाची मागणी नाही. हा प्रश्न फक्त आणि फक्त विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा आणि त्यांच्या भविष्यातील गुणवत्तेचा आहे. शिक्षकांच्या कमतरतेमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे आणि हे कोणत्याही परिस्थितीत आम्ही सहन करणार असल्याचे सांगितले.

> आमचा स्पष्ट निर्धार...
> विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी हा लढा आहे.
> पदासाठी नाही... राजकारणासाठी नाही...तर शिक्षणाच्या हक्कासाठी आहे.
> जोपर्यंत शाळेला एक पदवीधर शिक्षक आणि एक कायमस्वरूपी मुख्याध्यापक मिळत नाही, तोपर्यंत आम्ही आमरण उपोषण सुरू ठेवणार आहोत. मांडवे खुर्द मधील सर्व ग्रामस्थ, पालक, माजी विद्यार्थी आणि शिक्षणप्रेमींना नम्र आवाहन आहे की, मोठ्या संख्येने उपस्थित राहून या लोकहिताच्या शैक्षणिक आंदोलनाला पाठिंबा द्यावा.
> आज आपण विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे राहिलो, तर उद्या त्यांचे भविष्य आपल्या गावाचा अभिमान ठरेल.

## वरुण राजाच्या साक्षीने टेकवाडे येथे विद्यार्थ्यांकडून वृक्षारोपण



**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.२१, शिरपूर (धुळे) :** शिरपूर तालुक्यातील टेकवाडे येथील आर. सी. पटेल प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांच्या हस्ते उत्साहात वृक्षारोपण करण्यात आले. शाळेच्या पटांगणावर विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी मिळून रोपे लावत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. विशेष म्हणजे, दिनांक २१ जुलै सकाळी ठीक ८ वाजता विद्यार्थ्यांनी शाळेच्या पटांगणावर रोपे लावली आणि सकाळी ९ वाजताच रिमझिम पावसाला सुरुवात झाली. विद्यार्थ्यांच्या या निसर्गोपयोगी प्रयत्नांना जणू 'वरुण राजानेही सलामी' दिली, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. प्रत्येक विद्यार्थ्याने झाड लावून फोटो ग्रुपवर शेअर करण्याचे आवाहन शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या घरी किंवा अंगणात किमान एक झाड लावावे आणि त्याचा फोटो शाळेच्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर शेअर करावा, अशा सूचना शाळेकडून देण्यात आल्या आहेत. या उपक्रमांतर्गत शाळेतील तब्बल १०० विद्यार्थी झाडे लावणार आहेत. सूचना दिल्यानंतर अवघ्या एकाच दिवसात २० विद्यार्थ्यांनी स्वतः च्या अंगणात झाड लावून त्याचा फोटो ग्रुपवर पाठवत या मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. कार्यक्रमादरम्यान शिक्षक प्रशांत चौधरी यांनी विविध उदाहरणे देत विद्यार्थ्यांना वृक्ष लागवड आणि त्यांच्या संगोपनाचे महत्त्व पटवून दिले. वृक्ष हीच खरी मानवी जीवनाची संजीवनी असून प्रत्येकाने लावलेल्या झाडाचे जतन करण्याचे संकल्प या वेळी करण्यात आले.

या वृक्षारोपण कार्यक्रमाचा शुभारंभ मुख्याध्यापक किशोर सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी शिक्षक महेंद्र माळी, श्रीराम पाटील, भाईदास पावरा आणि श्वेता धनगर यांची प्रमुख उपस्थिती होती. विशेष म्हणजे सदर वृक्षारोपणासाठी विद्यार्थ्यांनी स्वतः रोपे तयार केलेले आहेत. यात आंबा, पेरू, जांभूळ अशा झाडांची रोपे तयार केलेली आहेत. तसेच फुल झाडांची रोपे विद्यार्थ्यांनी तयार केलेली आहेत. याच रोपांमधून वृक्षारोपण करण्यात आले.

## केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची NSUI कडून मागणी

### खापरखेडा पोलीस स्टेशनमार्फत राष्ट्रपतींना निवेदन



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२१, नागपूर :** देशातील शिक्षण व्यवस्थेची ढासळलेली स्थिती आणि विविध राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांमधील गैरप्रकार लक्षात घेता, केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामा द्यावा. अशी जोरदार मागणी नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडिया (NSUI) महाराष्ट्र प्रदेश सचिव साहिल गिऱ्हे यांच्यावतीने करण्यात आली आहे. या संदर्भात महाराष्ट्राच्या महामहिम राष्ट्रपती महामहिम द्रौपदी मुर्मूजी यांच्या नावे असलेले निवेदन खापरखेडा पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षकांमार्फत सादर करण्यात आले.गेल्या काही महिन्यांत NEET-UG, NEET-PG, UGC-NET आणि CUET सारख्या राष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाच्या परीक्षांमध्ये पेपर लीक, गैरव्यवहार आणि अनियमिततांच्या गंभीर घटना समोर आल्या आहेत. परीक्षा रद्द होणे, पुन्हा परीक्षा घेणे आणि निकालातील गोंधळ यामुळे लाखो विद्यार्थी व पालकांच्या मानसिकतेवर मोठा आघात झाला आहे. शिक्षण मंत्रालय या सर्व प्रकरणात अपयशी ठरल्याचा आरोप करण्यात आला.या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी आणि विद्यार्थ्यांचा शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास पुन्हा प्रस्थापित व्हावा, यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामा द्यावा. राष्ट्रपतींनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन केंद्र सरकारला योग्य ते निर्देश द्यावेत आणि शिक्षण व्यवस्थेत पारदर्शकता आणण्यासाठी उच्चस्तरीय चौकशी समिती नेमावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. निवेदन छडणख चे प्रदेश सचिव साहिल कृष्णाजी गिऱ्हे यांच्या नेतृत्वात देण्यात आले. या वेळी उपस्थित ग्रामपंचायत सदस्य धीरज देशभ्रतार, छडणख नागपुर जिल्हा सचिव संकेत वांढे, निशांत गेडाम, सायली नानवटकर, प्रज्वल राऊत आदी उपस्थित होते.

# चंद्रपुरात महिलांच्या सुरक्षेसाठी धावणार 'पिंक व्हॅन'




## दामिनी पथकाच्या नव्या वाहनाचा शुभारंभ

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२१, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यातील महिला आणि मुलींच्या सुरक्षेसाठी 'पिंक व्हॅन ' सेवा अधिकृतपणे सुरु करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या प्रांगणात या नवीन 'पिंक व्हॅन' ला हिरवा झेंडा दाखवून दामिनी पथकाच्या सेवेत दाखल करण्यात आले.

महिलांवरील अत्याचार रोखणे आणि छेडछाडीला पूर्णपणे आळा घालणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. कोणत्याही आपात्कालीन परिस्थितीत पिडीतांपर्यंत तात्काळ मदत पोहोचवण्यासाठी ही विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील महिला, तरुणी तसेच लहान मुला-मुलींच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत चंद्रपूर पोलीस दलाने एक महत्वाचे आणि कौतुकास्पद पाऊल उचलले आहे. कोणत्याही आपात्कालीन परिस्थितीत पिडीतांपर्यंत तात्काळ मदत पोहोचवणे या मुख्य उद्देशाने पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या प्रांगणात 'दामिनी पथका' साठी एका विशेष पिंक व्हॅनचा शानदार शुभारंभ करण्यात आला. यावेळी पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांच्या हस्ते पोलीस अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत या वाहनाचे शुभारंभ करण्यात आले. याप्रसंगी अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे उपस्थित होते.महिलांच्या सुरक्षिततेचा विचार करता या वाहनामध्ये विशेष प्रशिक्षण प्राप्त महिला पोलीस अंमलदाराचा ताफा तैनात करण्यात आला आहे. त्यामुळे संकटग्रस्त किंवा पिडीत महिलांना कुठलाही संकोच न बाळगता अत्यंत मोकळेपणाने आपली तक्रार मांडता येईल, हे पिंक वाहन चंद्रपूर शहरातील आणि संपूर्ण जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालये, बस स्थानके, रेल्वे स्टेशन, मुख्य बाजारपेठा तसेच निर्जन ठिकाणी नियमित गस्त घालून बारकाईने निगराणी ठेवणार आहे. संकटग्रस्त महिला किंवा मुलींनी मदतीची हाक देताच हे दामिनी पथक या वाहनाद्वारे थेट घटनास्थळी अतिशय जलद गतीने पोहोचून तात्काळ मदतउपलब्ध करुन देईल.

# थोडक्यात

## कुंडलजमध्ये जमिनीच्या वादातून मारहाण; आठ जणांवर गुन्हा दाखल



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, कर्जत (रायगड) :** कर्जत तालुक्यातील कुंडलज (पो.तिवरे) येथे जमिनीच्या जुन्या वादातून एका कुटुंबावर घरात घुसून मारहाण केल्याप्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मनोहर तुळशीराम माळी (वय ४५) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हा गुन्हा नोंदविण्यात आला.

फिर्यादीनुसार, ११ जुलै २०२६ रोजी रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी घराच्या अंगणात बसले असताना गावातील काही व्यक्ती तेथे आल्या. जुन्या जमिनीच्या वादाच्या कारणावरून शिवीगाळ करत त्यांनी लोखंडी रॉड व लाकडी काठ्यांनी मारहाण केली. या मारहाणीत फिर्यादी यांच्या डोक्यासह शरीराच्या विविध भागांना दुखापत झाली. त्यानंतर त्यांना उपचारासाठी प्रथम उपजिल्हा रुग्णालय, कर्जत येथे व पुढील उपचारासाठी रायगड येथील रुग्णालयात हलविण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी मुख्य सुत्रधार विलास अनंता भगत, रामदास बाळू भगत, ज्ञानेश्वर जयराम भगत, कमलाकर शांताराम भगत, निलेश शांताराम भगत, अपर्णा विलास भगत, जयश्री रामदास भगत व नीरा जगदीश भगत (सर्व रा.कुंडलज, ता.कर्जत) यांच्याविरुद्ध कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३०३/२०२६ बी.एन.एस कलम १८९(२), १९०, ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), १९१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास कर्जत पोलीस ठाण्याच्या महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल प्रिया राजेश कांबळे करीत आहेत.

# ग्रामीण पत्रकारांच्या हक्कासाठी पोंभुर्ण्यात नवी ताकद

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण पत्रकार संघाची तालुका कार्यकारिणी जाहीर




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, पोंभुर्णा (चंद्रपूर) :** ग्रामीण पत्रकारांच्या हक्कांचे संरक्षण, पत्रकारांना संघटित बळ मिळवून देणे आणि तालुक्यातील पत्रकारितेला नवी दिशा देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र राज्य ग्रामीण पत्रकार संघाच्या पोंभुर्णा तालुका कार्यकारिणीची घोषणा दिनांक २० जुलै २०२६ रोजी वनविभागाच्या विश्रामगृहात उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आली. यावेळी पत्रकारांच्या उपस्थितीत सर्वानुमते पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.

निवडीनुसार रुपेश निमसरकार यांची तालुका अध्यक्ष, जीवनदास गेडाम यांची कार्याध्यक्ष, सुरेश कोमावार यांची तालुका सचिव, विकास शेडमाके यांची उपाध्यक्ष, सचिन मडावी यांची कोषाध्यक्ष, तर महेश श्रीगिरीवार यांची सहसचिव म्हणून निवड करण्यात आली. तसेच दुर्योधन घोंगडे, किशोर माहोरकर, रुपेश मंकीवार, इकबाल कुरैशी, अतुल भडके, राकेश मेश्राम, धनराज कोवे यांची कार्यकारिणी सदस्य म्हणून निवड करण्यात आली. याशिवाय इतर सदस्य ही यावेळी उपस्थित होते.

नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी ग्रामीण पत्रकारांच्या न्याय्य हक्कांसाठी लढा उभारणे, पत्रकारांच्या विविध समस्या शासनापर्यंत पोहोचविणे, पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी तसेच त्यांच्या व्यावसायिक हितासाठी सातत्याने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

संघटनेच्या माध्यमातून तालुक्यातील ग्रामीण पत्रकारांना एकत्रित करून पत्रकारितेची विश्वासार्हता आणि सामाजिक बांधिलकी अधिक मजबूत करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. नवनियुक्त कार्यकारिणीचे विविध क्षेत्रातील पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, मान्यवर आणि हितचिंतकांनी अभिनंदन करून त्यांच्या भावी कार्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला. या निवड प्रक्रियेस महाराष्ट्र राज्य ग्रामीण पत्रकार संघाचे विदर्भ संघटक तथा जिल्हाध्यक्ष राजेश सोलापण, जिल्हा सचिव विनोद पन्नासे, मार्गदर्शक धर्मेश निकोसे, माजी निवासी जिल्हाधिकारी बडगेलवार तसेच तालुक्यातील अनेक ग्रामीण पत्रकार उपस्थित होते.

## गुजराथी कॉप्लेक्स येथे कापड दुकानाला आग



**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.२१, शिरपूर (धुळे) :** शिरपूर शहरातील गुजराती कॉम्प्लेक्स येथे अचानक दुकानाला आग लागली. आग एवढी भीषण होती. दुकान जळून खाक झाले आहे. सदर आग नगरपालिकेच्या अग्निशामक बंबाने विझविण्यात आली. ५ अग्निशामक बंबांनी आगीवर नियंत्रण मिळवले. मात्र आग मोठ्या प्रमाणावर पसरलेली होती. यावेळी बघ्यांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केलेली होती.

सदर आग दिनांक २० जुलै रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास लागली आहे. दुकान बंद करण्याच्या वेळेस सदर आगीचा प्रकार घडलेला आहे. आगीत लाखो रुपयांचे नुकसान झालेले आहे.गुजराती कॉम्प्लेक्स येथील कीट्टु फॅशन या कापडाच्या दुकानाला आग लागली. या आगीत दुकान पूर्णतः जळून खाक झाले आहे. या आगीत दुकानदाराचे लाखोंचे नुकसान झाले आहे. कारण दुकानातील कापड साहित्य व दुकानाचे फर्निचर सह सर्वच बेचिराख झाले आहे. सदर आग मोठ्या प्रमाणावर भडकली होती. आगीत बाजूलाच असलेल्या विशाल चष्माघर या दुकानाला ही आगीची झळ पोहचली. या दुकानाचा बाहेरचा भाग जळाला आहे. तर आग विझविण्यासाठी पाण्याचा वापर करावा लागला असल्याने दुकानाचे पीओपी खराब झाले आहे. या आगीत कोणत्या प्रकारची जीवितहानी झाली नाही हे सुदैव म्हणावे लागेल.

# ६६ गुंठे सामायिक जागेच्या वाटपाला वेग

## अतिक्रमणे हटविण्याचे आवाहन



**अभी नहीं, तो कभी नही...!**

जवळपास चार पिढ्यांपासून सदरचे क्षेत्र विनावापर विनावाटप पडून आहे. त्यामुळे निदान या पिढीत तरी सदरची अतिक्रमणे काढून जागा वहिवाटीत घेणे गरजेचे आहे. कारण,या पिढीने ते केले नाही तर ते पुढे कधीच होणार नाही. याचा विचार करून सदरची अतिक्रमणे काढून संबंधित वारसांना त्यांच्या हिश्शानुसार ताबा देण्यात येणार आहे. त्यामुळे सदर अतिक्रमण धारकांनी आम्हाला सकारात्म क प्रतिसाद द्यावा...ही अपेक्षा..

**- राजेंद्र बाजीराव थोरात (माजी सैनिक)**

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, उंब्रज (सातारा) :** कळंत्रेवाडी, ता.कराड येथील उत्तर मांड नदीकाठालगत असलेल्या गट क्रमांक ३८/१ मधील थोरात कुटुंबीयांच्या मूळ तीन बुडक्यांच्या सामायिक मालकीच्या ६६ गुंठे क्षेत्राच्या वाटप प्रक्रियेला वेग आला असून, संबंधितांनी या जागेवरील अतिक्रमणे तातडीने हटवावीत, असे आवाहन माजी सैनिक राजेंद्र बाजीराव थोरात यांनी केले आहे.

गावातील थोरात कुटुंबांची संख्या सुमारे ७० घरांपर्यंत पोहोचली असून, हे ६६ गुंठे क्षेत्र चार पिढ्यांपासून विनावापर पडून आहे. या पार्श्वभूमीवर सध्याच्या पिढीने एकत्र येत जागेची शासकीय मोजणी करून सातबारावरील आणेवारीनुसार प्रत्येकाचा हिस्सा निश्चित करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार कराड भूमापन कार्यालयाकडे आवश्यक शुल्क भरून अधिकृत मोजणी करण्यात आली असून, संबंधित क्षेत्राच्या हद्दीही कायम करण्यात आल्या आहेत. हद्दी निश्चित झाल्यामुळे आता जागेवरील अतिक्रमणे हटवून मूळ तीन बुडक्यांमध्ये ६६ गुंठे क्षेत्राचे समान वाटप करण्यात येणार आहे. त्यामुळे संबंधित अतिक्रमणधारकांनी स्वखुशीने अतिक्रमणे काढून जागा मोकळी करावी, असे आवाहन राजेंद्र थोरात यांनी केले आहे.

अतिक्रमणे हटविल्यानंतर जागेचे तीन समान भाग करून प्रत्येक भागातील संबंधित वारसांना त्यांच्या हिश्श्यानुसार ताबा देण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

दरम्यान, शासकीय मोजणी पूर्ण होऊन हद्दी निश्चित झाल्यानंतर आता पुढील टप्प्यात प्रत्यक्ष वाटपाची प्रक्रिया कशी आणि कितपत सुरळीत पार पडते? याकडे थोरात कुटुंबीयांसह ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. विशेषतः माजी सैनिक राजेंद्र थोरात यांच्या आवाहनाला संबंधितांकडून कसा प्रतिसाद मिळतो? यावर या बहुप्रतीक्षित वाटप प्रक्रियेचे भवितव्य अवलंबून राहणार आहे.

## भाजप ओबीसी मोर्चा तर्फे प्रभाग ८ येथे SIR अभियान



**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.२१, शिरपूर (धुळे) :** प्रदेश भाजप ओबीसी मोर्चा व शिरपूर वरवाडे नगर परिषद येथील प्रभाग ८ येथे SIR अभियानाबाबत विशेष बैठक व मार्गदर्शन शिबिर प्रदेश ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष तथा नगरसेवक शामकांत ईशी व नगरसेविका पुजा सोनार यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आली. निवडणूक आयोगातर्फे राज्यात SIR अभियान हे ३० जून ते २९ जुलै या कालावधीत राबविण्यात येत आहे. नागरिक व मतदारांमध्ये संबरामाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यासाठी माजी मंत्री आ.अमरिषभाई पटेल यांच्या नेतृत्वाखाली आ कांशीराम पावरा, नगराध्यक्ष भुपेशभाई पटेल, लोकनियुक्त नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदेश भारतीय जनता पक्ष ओबीसी मोर्चा व प्रभाग ८ यांच्या तर्फे तेली समाज मंगल कार्यालय शिरपूर येथे प्रदेश भाजप ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष शामकांत जगन्नाथ ईशी व नगरसेविका पुजा कमलेश सोनार यांनी प्रभागातील इडज, प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते, युवक, नागरिक, मतदार व स्वयंसेवक यांची संयुक्तिक महत्वपूर्ण बैठक व मार्गदर्शन शिबिरघेण्यात आले.

या बैठकीला प्रदेश ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष तथा नगरसेवक शामकांत ईशी यांनी SIR बाबत विशेष मार्गदर्शन केले व कोणीही घाबरून न जाता BLO यांना सहकार्य करावे BLO यांनीही घरोघरी जाऊन लोकांना मार्गदर्शन करून फॉर्म भरून घ्याव असे सांगून पदाधिकारी यांनीही त्यांना सहकार्य करावे असे सांगून शंभर टक्के काम करण्याचे आवाहन केले. यावेळी BLO विकास माळी यांनी फॉर्मचे प्रात्यक्षिक दाखवून मार्गदर्शन केले.यावेळी भाजप कार्यकारिणी सदस्य नरेश चौधरी, मोमीन समाजाध्यक्ष राज टेलर, जितेंद्र सोनवणे, सादिक खाटीक, प्रा.प्रितम जैन, रईस सर यांनी मार्गदर्शन केले. या बैठकीत डखठ अभियानाची प्रभावी अंमलबजावणी, नियोजन तसेच संघटनात्मक कामकाजाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. अनेक मतदारांचे SIR फॉर्म भरून घेण्यात आले. यावेळी शामकांत ईशी, नगरसेविका पुजा सोनार व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घरोघरी SIR फॉर्म ही वाटप करण्यात आले.

या कामाचे मतदारांनीही अभिनंदन करून कौतुक केले. या बैठकीला भाजप सरचिटणीस सुनिल चौधरी, कमलेश सोनार, दुर्गेश चौधरी, शाकिर मिस्तरी, हिरालाल चौधरी, दिनेश चौधरी, सुरेन्द्र चौधरी, मयुर ऐशी,प्रतिक ईशी, तिरत धोबी, संतोष लोहार, भरत लोहार, ईश्वर लोहार, दिनेश लोहार, शेखर चौधरी, छोटू निकम, जितेंद्र सोनार, भारत सैंदाने, पंकज थोरात, जगदीश थोरात, जितेश सोनवणे, विनायक पाटील, दीपक मराठे, सुनिल चौधरी, कैलास सोनार, हेमंत चौधरी, जयेश चौधरी, प्रविण भैय्या राजपूत, सुनिल लोहार, महेश माळी, प्रमोद गुजराथी, जितेंद्र सोनार, राहुल फुलारी, लखन मराठे, योगेश चौधरी, धिरज चौधरी, प्रसक ठाकूर, स्वप्निल पाटील, शाहिद पलंबर, आसिफ मोमीन, तौसिफ राही मण्यार, आसिफ मोमीन, अजीज मोमीन, एजाज पठाण, BLO सुनील सोनवणे, संजय खंडू चौधरी, विकास माळी, सुवर्णा माळी, अफरीन शेख, वकार शेख, रईस मण्यार यांचेसह प्रभागातील नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# अजित पवारांच्या जयंतीनिमित्त २२ जुलैपासून जनसेवा सप्ताह

## पारनेर तालुक्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि२१, पारनेर (अहिल्यानगर) :** राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी अध्यक्ष तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये येत्या २२ ते २८ जुलै दरम्यान पक्षातर्फे 'जनसेवा सप्ताह' पाळण्यात येणार असून त्याअंतर्ग सेवाकार्याची नवी सुरुवात या संकल्पनेतून पारनेर तालुक्यात विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. आमदार काशिनाथ दाते यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर व पक्षाच्या इतर सर्व पदाधिकाऱ्यांच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, समाजोपयोगी सेवाकार्यातून जयंती सप्ताह साजरा करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत दि.२२ जुलै २०२६ रोजी सकाळी ९ वाजता आ.काशिनाथ दाते जनसंपर्क कार्यालय, पारनेर येथे आनंदऋषि ब्लड बँक, अहिल्यानगर यांच्या सहकार्याने भव्य रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले आहे. त्यानंतर सकाळी ११.३० वाजता पारनेर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, पंचायत समिती परिसरात, पारनेर वेस येथील महात्मा ज्योतिबा फुले पुतळा, सेनापती बापट स्मारक तसेच बाजारतळ येथील डॉ. बाबासाहेब स्मारक परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. दुपारी २ वाजता भाळवणी व पारनेर शहरातील वरची वेस येथे वृक्षसंवर्धन व वृक्षारोपण कार्यक्रम होणार असून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात येणार आहे. दि.२३ ते २७ जुलै दरम्यान राळेगण थेरपाळ येथे स्व.अजितदादा पवार युवा चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेत तालुक्यातील अनेक युवा संघ सहभागी होणार आहेत.

यासोबतच जयंती सप्ताहनिमित्त आयोजित गौरव सोहळ्यात तालुक्यातील आदर्श शेतकरी, आदर्श गोपालक, आदर्श कृषीकन्या, तसेच विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात येणार आहे.